# महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

वैद्यकीय शिक्षण व संशोधन शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, चौथा मजला, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डीमेलो रोड, मुंबई - ४०० ००१. ई-मेल - msbnpe@gmail.com, दुरध्वनी : ०२२ -२२६२०३६०

MAHARASHTRA STATE BOARD OF NURSING AND PARAMEDICAL EDUCATION

Directorate of Medical Education and Research, ४th Floor, St. Georges Hospital Campus, D◦ Melo Road, Fort, Mumbai - ४०० ००१.E-mail- msbnpe@gmail.com, Telephone - ०२२-२२६२०३६०


---

क्र. मराशुवपशिमं/संलग्नता मुदतवाढ/२०२५-२६/३९९४/२०२५ दि.०५/१२/२०२५

## परिपत्रक

प्रति,
प्राचार्य/संस्थाप्रमुख,
सर्व संलग्नीत परिचर्या प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य.

विषय:- शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता मंडळाकडून सर्व संलग्नीत अभ्याक्रमाकरीता संलग्नता देण्याबाबत.

संदर्भ :- १. क्र. मराशुवपशिमं/संलग्नता/२०२५-२६/१८७२/२०२५, दि. ३०/०५/२०२५
२. क्र. मराशुवपशिमं/संलग्नता/२०२५-२६/२०२०/२०२५, दि. ११/०६/२०२५
३. क्र. मराशुवपशिमं/संलग्नता/२०२५-२६/२३४८/२०२५, दि. १८/०७/२०२५
४. क्र. मराशुवपशिमं/संलग्नता/२०२५-२६/२४५९/२०२५, दि. ३१/०७/२०२५
५. क्र. मराशुवपशिमं/संलग्नता/२०२५-२६/२९०७/२०२५, दि. ०१/०९/२०२५
६. क्र. मराशुवपशिमं/संलग्नता/२०२५-२६/३५१४/२०२५, दि. ०१/१०/२०२५
७. क्र. मराशुवपशिमं/संलग्नता/२०२५-२६/३५८१/२०२५, दि. १५/१०/२०२५
८. क्र. मराशुवपशिमं/संलग्नता/२०२५-२६/३६६६/२०२५, दि. ३१/१०/२०२५
९. क्र. मराशुवपशिमं/संलग्नता/२०२५-२६/३७०३/२०२५, दि. ०७/११/२०२५

महोदय,

उपरोक्त संदर्भाधिन विषयान्वये संदर्भ क्र. १ ते ८ नुसार सर्व प्राचार्य/संस्थाप्रमुख यांना मंडळामार्फत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता संलग्नता पत्र देण्यापूर्वी प्रत्येक संलग्नित संस्थेने Online Affiliation Registration करून घेण्यात यावे, याबाबतचे परिपत्रक मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले होते. संदर्भ क्र. ९ नुसार Online Affiliation Registration करण्याकरीताची अंतिम दिनांक १४/११/२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती, परंतु अद्याप काही संस्थांमार्फत Online Affiliation Registration करण्यात आलेले आहे परंतु अद्याप संस्थेची सर्व आवश्यक माहिती व मुळ कागदपत्रे Upload करण्यात आलेली नाही.

त्याकरीता शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता संलग्नता (Affiliation) मिळण्याकरीता **दिनांक ०५/१२/२०२५ ते १२/१२/२०२५ पर्यंत अंतिम मुदतवाढ** देण्यात येत आहे. या कालावधीत Online पध्दतीने Online Affiliation Registration केल्यानंतर संस्थेची सर्व आवश्यक माहिती व मुळ कागदपत्रे Upload करून Submit करावे.

संस्थेमार्फत भरण्यात आलेली माहिती व मुळ कागदपत्रांची पडताळणी मंडळामार्फत करण्यात येईल. मंडळाकडून मान्यता (Approval) झाल्यानंतर संस्थेने संलग्नता शुल्क (Affiliation Fees) चा भरणा Online पध्दतीने करावा. संस्थेकडून Upload करण्यात आलेली माहिती व मुळ कागदपत्रांमध्ये काही त्रुटी किंवा चुकीची माहिती आढळल्यास त्रुटींची पुर्तता केल्यानंतरच संलग्नता पत्र शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता देण्यात येईल.

**सदर मुदतवाढ ही अंतिम मुदतवाढ असून यानंतर कोणत्याही कारणास्तव मुदतवाढ देण्यात येणार नाही, याबाबत प्राचार्य व संस्थाप्रमुख यांनी नोंद घेण्यात यावी. Online Affiliation Registration विहीत कालावधीत न झाल्यास विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक व आर्थिक नुकसानाकरीता तसेच कायदेशिर बाबी उद्भवल्यास सर्वस्वी प्राचार्य / संस्थाप्रमुख जबाबदार राहतील याची नोंद घेण्यात यावी.**

Online Affiliation Registration करताना काही अडचणी आल्यास खालील मंडळाच्या दूरध्वनीवर संपर्क करावा.

मो. नंबर - ८९७६२७९९३१ ( IT- Department ) व ई-मेल - affiliation.msbnpe.२०२५@gmail.com

प्रबंधक
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

प्रत माहितीस्तव सविनय सादर:
१) मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, नविन मंत्रालय, गो.ते. रू.संकुल, मुंबई.
२) मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन तथा आयुष विभाग, मुंबई.
३) मा. संचालक, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई.